**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या २१ व्या हप्त्याचं पंतप्रधानांच्या हस्ते वितरण**

2. **माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज देशभरातून आदरांजली**

3. **तुकडेबंदी कायद्याचं उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहार आता निःशुल्क नियमित आणि कायदेशीर करण्यात येणार**

4. **मुख्यमंत्री महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचं दिनांक २२ ते २७ नोव्हेंबर दरम्यान नागपुरात आयोजन**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

तामिळनाडूच्या कोईम्बतूर इथं दक्षिण भारत प्राकृतिक कृषी शिखर संमेलन २०२५ चं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या २१ व्या हप्त्याचं वितरण मोदींच्या हस्ते करण्यात आलं. उद्घाटनापूर्वी संमेलनस्थळी लावलेल्या सेंद्रीय शेतमालाच्या स्टॉलला पंतप्रधानांनी भेट देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात सुमारे पाच हजार शेतकरी सहभागी झाले आहेत. आपल्या संबोधनात पंतप्रधांनी नैसर्गिक शेतीवर भर देण्याचं आवाहन केलं-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी - २१ सेकंद )***

***साथियों, हमारी मिट्टी की फर्टिलिटी और क्रॉप में न्यूट्रिशनल रिवाइवल के लिए हमें नेचुरल फार्मिंग के रास्ते पर बढ़ना ही होगा। ये हमारा विजन भी है और हमारे जरूरत भी है। तभी जाकर हम अपनी आने वाली पीढ़ियों के लिए अपनी बायोडाइवर्सिटी को संरक्षित रख पाएंगे।***

केंद्र सरकार आणि  राज्य सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या 21 व्या हफ्त्याचं वितरण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं. यापूर्वी राज्य शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून भरीव रक्कम वितरित करण्याचं काम केलं आहे. या नवीन 21 व्या हप्त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना लागवड, बियाणे, उपजीविका आणि इतर कृषी खर्चासाठी आवश्यक असे तातडीचे आर्थिक बळ मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.सध्या रब्बी पेरणीचे दिवस असल्यामुळे खते आणि  बी बियाण्यांसाठी पीएम किसान निधी योजनेच्या माध्यमातून मिळालेली रक्कम  महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना अकोला येथील शेतकरी नरेंद्र वाकोडे यांनी व्यक्त केली.

(***होल्ड बाईट - शेतकरी नरेंद्र वाकोडे - १७ सेकंद )***

***मला  आज पी. एम. सन्मान निधीचे  दोन हजार रुपये जमा झाले त्याच्यापासून मला शेतीविषयक जे काम करायचे आहेत पेरणी ,तुरीला  फवारणी ही यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले अशी योजना आम्हाला जे काही शेतीचे काम करायला आहे ते योग्य आहे***

------------------------------------------------

**प्रधानमंत्री पीकविमा**

वन्य प्राण्यांचे हल्ले आणि धानाच्या पिकात पाणी साचणं यालाही आता प्रधानमंत्री पीकविमा योजनेचं संरक्षण मिळणार आहे. वन्यप्राण्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीला आता स्थानिक जोखीम म्हणून, तर धानाच्या पिकात पाणी साचून झालेल्या नुकसानीला स्थानिक आणीबाणी म्हणून मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिली. नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या आत पीकविमा ॲपवरून शेतकऱ्यांना जिओटॅग असलेल्या फोटोंसह नुकसानीची माहिती द्यावी लागेल. हा निर्णय २०२६ च्या खरीप हंगामापासून लागू होणार आहे.

------------------------------------------------

**इंदिरा गांधी/ एकता दिन**

माजी पंतप्रधान  दिवंगत इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज देशभरात आदरांजली वाहिली जात आहे. पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी इंदिरा गांधी यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही इंदिरा गांधी यांना आंदराजली वाहिली.इंदिरा गांधी यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्त आज आकाशवाणी कार्यालयात

कार्यालय प्रमुख मनीषा शेटये यांनी सर्व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित समारंभात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी.यांनी इंदिरा गांधी यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करुन आदरांजली अर्पण केली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात तसंच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात इंदिरा गांधी यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात राष्ट्रीय एकात्मता दिवसाची शपथ घेण्यात आली.

-----------------------------------------------

**इफ्फी**

भारताचा ५६ वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फी उद्यापासून गोव्यात पणजी इथ सुरू होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधल्या २४० चित्रपटांचा समावेश असेल. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. गोव्यात मडगाव इथ रवींद्र भवनात हा चित्रपट दाखवला जाईल. येत्या २८ तारखेपर्यंत हा महोत्सव सुरू असेल. दरम्यान पत्र सूचना कार्यालय महाराष्ट्र-गोवा आणि फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने गोव्यात मान्यताप्राप्त मीडिया प्रतिनिधींसाठी चित्रपट रसास्वाद शिबिर आयोजित करण्यात आलं.पत्रकारांना सिनेमाबद्दल सखोल माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

-----------------------------------------------

**मुख्यमंत्री**

पूर्वी गुन्हे सिद्ध होण्याचं प्रमाण केवळ ९ टक्के होतं मात्र गेल्या दहा वर्षांत ते वाढून ५३ टक्के झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. फडनवीस यांच्या हस्ते नवीन फौजदारी कायद्यांवरील प्रदर्शनाचं उदघाटन आज मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते. ब्रिटिशांनी तयार केलेले फौजदारी कायदे हे भारतीयांवर राज्य करण्यासाठी तयार करण्यात आले होते. ते लोकशाहीसाठी पोषक नव्हते. त्यामुळे नव्या कायद्यांची गरज होती, असं मुख्यमंत्री म्हणाले. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांत सामाजिक बदल झाले, गुन्हयांचं स्वरुप आणि गुन्हे घडण्याच्या पद्धती बदलल्या. त्यात तंत्रज्ञानाचा शिरकाव झाला. त्यामुळे केंद्र सरकारने तीन नवे फौजदारी कायदे लागू करण्याचा निर्णय घेतला, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**तुकडेबंदी कायदा**

तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहार आता निःशुल्क नियमित आणि  कायदेशीर करण्यात येणार आहे. या निर्णयाचा राज्यातील ६० लाख कुटुंबांसह सुमारे ३ कोटी नागरिकांना फायदा होणार आहे.

-----------------------------------------------

**मुख्यमंत्री महाकरंडक**

'मुख्यमंत्री महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा - 2025' येत्या, २२ ते २७ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती आमदार संदीप जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.  या स्पर्धेत 1 ऑगस्ट 2023 ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत राज्यातील विविध स्पर्धांमध्ये प्रथम किंवा द्वितीय पारितोषिक प्राप्त करणा-या मराठी एकांकिका सादर केल्या जाणार आहेत. ही स्पर्धा रविवार, 23 नोव्हेंबरपासून सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर इथं पार पडेल. प्रथम क्रमांकासाठी रु. 1 लाख 51 हजार, द्ववितीयसाठी १ लाख तर तृतीय क्रमांकावर येणाऱ्या नाटकाला  50 हजारांच पारितोषिक दिल जाणार आहे. स्पर्धेचे उदघाटन २२ नोव्हेंबरला राम गणेश गडकरी रंगमंच इथं 'The Folk आख्यान' या लोकसंगीत आणि लोकनृत्य कार्यक्रमाने होईल. तर समारोप सोहळ्यात पदमश्री पुरस्कारानं सन्मानित ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांचा सपत्निक नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

-----------------------------------------------

**बेसा-पिपळा**

नागपूर जिल्ह्यातील बेसा-पिपळा नगरपंचायतीच्या निवडणुकीत सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी  नगराध्यक्षपदासाठी एकूण ९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ७ नामनिर्देशनपत्रे तपासणीत पात्र ठरली आहेत. तसेच, प्रभाग क्रमांक १ ते १७ मधील एकूण ८३ उमेदवारांनी नगरसेवकपदासाठी अर्ज दाखल केले होते, त्यापैकी ७२ अर्ज पात्र ठरल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी भारत नंदनवार यांनी दिली.  उमेदवारांना आजपासुन २५ नोव्हेंबर पर्यंत  नामनिर्देशन मागे घेता येणार आहे. अंतिम उमेदवार यादी २६ नोव्हेंबर रोजी जाहीर होईल. मतदान २ डिसेंबर रोजी होणार असून, मतमोजणी आणि निकाल ३ डिसेंबरला जाहीर केले जातील.

-----------------------------------------------

**जनजागृती**

नगरपंचायत मालेगाव येथे जिल्हा स्वीप अभियानांतर्गत एनसीसी विद्यार्थ्यांनी पथनाट्य आणि फ्लॅश मॉबच्या माध्यमातून प्रभावी मतदान जनजागृती केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा उपक्रम

आयोजित करण्यात आला होता. 'माझे मत, माझा अधिकार' या घोषणेसह विद्यार्थ्यांनी मतदानाचा अधिकार, जबाबदारी आणि लोकशाहीचे महत्त्व यांची प्रभावी मांडणी केली.

-----------------------------------------------

**बॅडमिंटन**

भारताच्या एच.एस. प्रणय, आयुष शेट्टी आणि थरुन मन्नेपल्ली यांनी ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत प्रभावी विजय मिळवत दुसऱ्या फेरीत स्थान निश्चित केल आहे.

-----------------------------------------------

**मुष्टियुद्ध स्पर्धा**

ग्रेटर नोएडा इथे शहीद विजय सिंह पाठक क्रीडा संकुलात सुरू असलेल्या जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धा २०२५ मध्ये महिलांच्या गटात भारताच्या अरुंधती चौधरी हिनं जर्मनीच्या लिओनी मुलर हिला पराभूत केलं. तर मिनाक्षी, अंकुश फांगळ, प्रवीण आणि नुपूर यांनी त्यांच्या गटात उत्तम कामगिरी नोंदवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

-----------------------------------------------

**हवामान**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने जिल्ह्यात थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तविली असून नागरिकांना सावधगिरीचा सल्ला दिला आहे. गोंदिया इथं १० पूर्णांक ४ तर नागपुरात ११ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं ३० अंश इतकं नोंदविण्यात आलं.

-----------------------------------------------

**पासपोर्ट**

पासपोर्ट सेवा कार्यक्रमा अंतर्गत २०३५ पर्यंत ई पासपोर्टचं ट्रान्झिशन पूर्ण करण्याचं काम केंद्र सरकार करत आहे. यानुसार नव्याने दिलेला पासपोर्ट ई पासपोर्ट होईल, तसंच सध्याचा बिगर इलेक्ट्रॉनिक पासपोर्ट त्याची मुदत संपेपर्यंत वैध असेल.

-----------------------------------------------